ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-7

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.7 Mar - Apr 2022

# जागतिकीकरण आणि इंद्रजित भालेरावांची कविता

प्रा.डॉ.महेश रणदिवे
मराठी विभाग,राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज,कोल्हापूर

प्रास्ताविक :

जागतिकीकरण ही खूप मोठी आणि व्यापक संकल्पना आहे. भारताने व्यापार, व्यवसायाला चालना मिळावी म्हणून १९९१ साली गॅट करारावर स्वाक्षरी केली आणि खुल्या अर्थव्यवस्थेचे वारे सर्वत्र गतिमान बनले. देश विकसनशील अवस्थेतून विकासित व्हावा यासाठी जागतिक व्यापार संघटनेच्या धोरणांना भारताने पाठिंबा दिला. गुणवत्तेच्या दृष्टीने या जागतिकीकरणाच्या धोरणांना महत्वही आहे. कारण राष्ट्रीय पातळीवरील मोठ-मोठे उद्योग, व्यापार, शिक्षण इत्यादी क्षेत्रे यामुळे झपाट्याने विकसित होत आहेत. शेती क्षेत्रालाही वरदान ठरावे अशी राष्ट्रीय स्तरावर अपेक्षित कामगिरी होते आहे. दळणवळण माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचाही झपाट्याने विस्तार होतो आहे. फोन, संगणक इंटरनेट, दूरदर्शनचे नवे चॅनल यामुळे माहितीचा ओघ वाढला आहे. या नव्या माहिती तंत्राचा वापर करून आर्थिकदृष्ट्या प्रबळ असणारे लोक स्वतःचा उद्योग व्यवसाय विस्तारू लागले आहेत. पण जे गरीब आहेत ते गरीबच राहिले ते अधिक पिचले गेले आणि भांडवलदारांची मक्तेदारी निर्माण झाली. भारत हा लोकसंख्येने मोठा असलेला देश आहे. तो एक मोठी बाजारपेठ म्हणून जगासमोर आला. विदेशी कंपन्यांनी आपला मोर्चा भारताकडे वळवला आणि जाहिरातीच्या नव्या तंत्राचा वापर करून, विविध कौशल्य वापरून परकिय वस्तू भारतीयांच्या माथी मारल्या जाऊ लागल्या आणि परकीय वस्तूंचे आकर्षण येथील लोकांच्या मनात निर्माण केले. स्वदेशी वस्तू भारतीय जनतेला निकृष्ट वाटू लागल्या. विदेशी वस्तू घेणे लोक पसंत करू लागले. त्यामुळे अनेक भारतीय उद्योग बंद पडले.

जागतिकीकरणाच्या झंजावतात ग्रामीण भागही होरपळून निघाला. गावचा विकास झाला पण गावात अनेक बदल झाले. एकेकाळी आनंदाने नांदणारा गाव, गावची संस्कृती प्रचंड बदलली. पूर्वीचा गाव हा गाव राहिला नाही. गावचे गावपण नाहीशी झाले आणि गावाला अवकळा प्राप्त झाली. मानवाच्या कामाची जागा यंत्राने घेतल्यामुळे बेभरवशाचा पाऊस आणि वरून नोकऱ्या नाहीत म्हणून गावातील पोरं ऊनाड फिरू लागली. आज आपल्या मुलाला शिकवले म्हणजे उद्या तो नोकरी मिळवून स्वतःच्या पायावर उभे राहून आपला सांभाळ करेल अशी अपेक्षा ठेवणाऱ्या आई-वडिलांचा भ्रमनिरास झाला. पाऊस नाही, पाणी नाही म्हणून अनेक लोक गाव सोडून नोकरीच्या शोधात स्थलांतर करू लागले. शेणा-मातीच्या चुली बंद होऊन त्याची जागा गॅसने घेतली. छपराची घरे जाऊन सिमेंटची बांधकामे उभी राहिली. शहरी संस्कृतीतील नव्या जगण्याने आणि नव्या जीवनशैलीच्या प्रभावाने ग्रामसंस्कृतीतील लोकांचे जगणे बदलले. गावची माणसं एकेकाळी जवळून गेली तर मन भरून बोलायची, आपुलकीने एकमेकांशी चौकशी करायची पण आज त्यांची मने संकुचित झाली आहेत. नात्या- नात्यांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे. जागतिकीकरण गावात घुसले आणि गावाला शहराचे स्वरूप प्राप्त झाले. एकेकाळी झाडेझुडपे, पशुपक्षी, निसर्ग यांनी समृद्ध असलेला गाव मोडकळीस आला आणि संपन्न ग्रामसंस्कृतीला तडे गेले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे बदललेल्या या समाजजीवनाची चित्रे अनेक कवींनी सजगतेने आपल्या कवितेतून चित्रित केलेली आहेत. यामध्ये कवी इंद्रजित भालेराव यांचा उल्लेख विशेषत्वाने करावा लागेल. यासंदर्भाने इथे त्यांच्या 'टाहो' कवितासंग्रहातील कवितांचा विचार केलेला आहे. कवी इंद्रजित भालेराव हे १९६० नंतरच्या ग्रामीण कवितेतील कवितालेखन करणारे एक महत्वाचे ग्रामीण कवी आहेत. त्यांचे अनेक कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यापैकीच 'टाहो' हा २००४ साली प्रकाशित झालेला त्यांचा एक आगळा-वेगळा असा कवितासंग्रह आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे उध्वस्त झालेल्या समाजवास्तवाचा वेध घेण्यामध्ये कवी इंद्रजीत भालेराव हे कमालीचे यशस्वी झालेले आहेत. जागतिकीकरणाचे प्रस्त वाढल्याचे स्पष्ट करताना कवी भालेराव लिहितात,

"महाराष्ट्रातील कोणतेही गाव
त्या गावचं काहीही नाव
त्या गावची पडकी वेस
इतिहासाला लावते ठेच
गावच्या हनुमंताचा पार
अजून तिथे धजे न नार
त्या गावच्या गढीची माती
मालक कोरून कोरून खाती "'

अशाप्रकारे वाढत्या जागतिकीकरणामुळे गावगाड्यांनी बद्ध असलेला, एकमेकांच्या सलोख्याने, आदराने राहणारा गाव बदलला. गावात प्रवेश करताच गावची वेस इतिहासाची नोंद द्यायची. हनुमंताच्या पारावर गावचे लोक गावच्या विकासाची चर्चा करत बसायचे पण आज गावाला सरपंचाच्या रूपाने मालक निर्माण झाले. गावात हनुमंताच्या पारावर अनेकजण डाव खेळू लागले. गावात राजकारण करून आपापसात लोक भांडणतंटा, दंगे निर्माण करू लागले.गावची वेस, पार, शिवार यांची माती विकून गावातील गुंडलोक चैनीचे जीवन जगू लागले. गरिबाला कोणी वाली नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे. गावचे हे सूक्ष्म निरीक्षण कवी भालेराव यांनी टिपले आहे. असे गावातील नव्या बेताल बदलाचे चित्रण त्यांच्या कवितेतून येताना दिसते.

जागतिकीकरणामुळे अनेकांचे व्यवसाय देशोधडीला लागले. समृद्ध समजल्या जाणाऱ्या खेड्यांनी बकाल रूप धारण केले आहे. गावातील सोनार, लोहार, चांभार, कुंभार, सुतार, वाणी, नाभिक या व यांसारख्या अनेकांचे व्यवसाय बुडाले त्यामुळे उदरनिर्वाह कसा करायचा हा प्रश्न उभा

राहिला. त्यामुळे रोजगाराच्या, व्यवसायाच्या शोधात शहराकडे अनेक लोक स्थलांतरित झाले परिणामी ग्रामसंस्कृती ओस पडते की काय अशी भीती निर्माण झाली याचे चित्रण करताना कवी लिहितात,

"भीवू बाबाने झाडल्या लाथा
बापू यांनी गुंडाळला गाशा
गोसावी बाबाची चिलीम उशी
मानभाव विसरले सकाळ निशी
मुसलमानाने टोकली बांग
तुबईला जाऊन बसली झोप"[1]

गावातच स्वतःचा व्यवसाय करून समाधान मानणारे लोक व्यवसायाच्या शोधात हळूहळू शहराच्या ठिकाणी स्थलांतरित होऊ लागले यामुळे शहरे फुगली आणि गुण्यागोविंदाने राहणारी ग्रामसंस्कृती ओस पडू लागली. बदललेल्या गावची ही खंत कवीने व्यक्त केली आहे. जागतिकीकरणाने खेड्याचे झालेले परिवर्तन खेड्यास हानीकारक ठरू लागले शहरात गर्दी होऊ लागली म्हणून मोठमोठे प्रकल्प ग्रामीण भागात स्थलांतरित केले जाऊ लागले त्यामुळे शहराबरोबरच ग्रामीण भागातील वातावरणही बदलले. पर्यावरणाचे संतुलन बिघडले. नेहमी पडणारा पाऊस दूषित वातावरणामुळे गायब झाला याचे ग्रामजीवनावर विदारक परिणाम होऊ लागले. गावची ही वस्तुस्थिती पाहून कवीचे संवेदनशील मन हळहळ व्यक्त करते.

"पानावनात पाऊस नाही
बहिणीचा मूळ भाऊस नाही
भुईच्या पोटात कोरडी धग
दुष्काळाने जमले ढग"

गाव पातळीवर कंपन्यांची संख्या वाढली, कारखाने वाढले. लोकांनी उद्योग, व्यवसाय यासाठी झाडे तोडून टाकली त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला. वेळेवर येणारा पाऊस कधी पडतो तर कधी पडतच नाही त्यामुळे जमिनीच्या पोटात पाण्याविना धग निर्माण झाली. पाणी नाही म्हणून पिके करपून गेली. पिकांवर अवलंबून असणारा शेतकरी मेटाकुटीस आला. दुष्काळामुळे रोजगारासाठी लोकांची वण-वण निर्माण झाली. हे ग्रामवास्तव कवीने अचूकतेने टिपले आहे. गावची प्रगती होण्याऐवजी जागतिकीकरणाने मोठ्या प्रमाणात पडझड झाली. हे नाकारता येणार नाही. कवी हे स्पष्ट करताना एका कवितेत लिहितात,

"आयत्या बिळावर पायत सरण
गावचं झालं जागतिकीकरण"

गावात रस्ते, रेल्वे, बस, विज सर्वकाही सेवा सुविधा मिळू लागल्या पण गावात माणसामाणसात स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले. शेतीचे यांत्रिकीकरण झाले. शेतीत रासायनिक खतांचा अतिरिक्त वापर करू लागले. कमी वेळात आणि कमी खर्चात येणारी पिके घेऊन शेतकरी तो स्वतः विषमुक्त नव्हे तर विषयुक्त अन्न खाऊ लागला त्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या. एकेकाळी दिवसभर पारावर बसून राहणारा माणूस दिवसभर स्वतःच्याच विचारात मग्न झाला आहे. दिवसभर बालसवंगड्यांसोबत, निसर्गाच्या सहवासात खेळणारी मुले पहाटेपासूनच शहरातल्या मुलांप्रमाणे शिक्षणासाठी मग्न आहेत. जागतिकीकरणाने खेड्याचे झालेले हे परिवर्तन खेड्यास, खेड्यातील माणसास हानिकारक ठरू लागले आहे.

कवी इंद्रजीत भालेराव यांची कविता जागतिकीकरणामुळे खेड्यावर, खेड्यातील माणसांवर केवळ होणारे परिणामच चित्रित करते असे नाही तर ती जागतिकीकरणाच्या या अवस्थेमुळे आपण दक्ष राहिले पाहिजे याचे मार्गदर्शनही करते. कवी म्हणतात,

"आपले मुठीतील लोंढे
गाफील राहिलो आपण
तर सगळंच नेतील कापून"

खेड्यांची जागतिकीकरणाने बदललेली ही परिस्थिती सुधारण्यासाठी लयास चाललेल्या खेड्यांना वाचवायला पाहिजे. त्यासाठी जागतिकीकरण समजून घेतले पाहिजे. मोबाईल, इंटरनेट, व्हिडिओ गेम, शेतीचे यांत्रिकीकरण यांचा अतिरेकी वापर रासायनिक खतांचा अतिरिक्त वापर न करता आवश्यक तेवढा वापर करायला हवा. हे प्रत्येकाने जाणीवपूर्वक ठरवायला हवे. जागतिकीकरणाच्या संदर्भात आपण गाफील राहिल्यास त्याचे विदारक परिणाम भोगावे लागतील. हे कवी प्रतिमा-प्रतीकांच्या रूपाने स्पष्ट पणाने सांगतात,

"त्यांचे येतील उंट
आपणाला करती खुरटे
त्यांच्या येतील मेंढ्या
आपल्या बांधतील मेंढ्या"

त्यासाठी सर्वांनी सावध होणे आवश्यक आहे. बाहेरून उंट, मेंढ्या येऊन आपल्याला खुरटे करण्याआधी त्यांचा बंदोबस्त आपण केला पाहिजे. जागतिकीकरणाच्या संदर्भात जागृती निर्माण झाली पाहिजे. अन्यथा 'आयत्या बिळावर पायत सरण' असे चित्र निर्माण होईल. त्यासाठी हे सर्व होण्याआधीच बदलत्या परिस्थितीला समजून उमजून घेऊन वरील परिस्थितीला समर्थपणे सामोरे गेले पाहिजे.

**संदर्भ:**

1. भालेराव इंद्रजित, 'टाहो', 'प्रतिभास प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती २००४, पृ. २२

2. तत्रैव, पृ. २६.
3. तत्रैव, पृ. २८.
4. तत्रैव, पृ. ३६
5. तत्रैव, पृ. ३८.
6. तत्रैव, पृ. ४०